## थोडक्यात...

### कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक ऑडिट कॅम्प संपन्न

**परभणी-** कै. सौ.कमलाताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथे राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक ऑडिट कॅम्प संपन्न झाला. परभणी जिल्हा ऑडिट कॅम्प साठी उपस्थित असलेले स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. डॉ. मारोती गायकवाड यांचा सत्कार प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केला. सी. ए. मनोहर आयेलानी यांचा सत्कार प्रा. डॉ. राजू शेख यांनी केला. राजू नवले यांचा सत्कार प्रा. डॉ. गणपत मोरे यांनी केला.तेजस आहिलांनी यांचा सत्कार प्रा. डॉ.कालिदास गुडदे यांनी केला. परभणी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. राजू शेख यांनी मानले. कॅम्पचे आयोजन प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे, कै.सौ.कमलाताई जामकर महिला महाविद्यालय परभणी यांनी केले होते.या राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक ऑडिट कॅम्पला महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नसीम बेगम अब्दुल सलीम यांचे सहकार्य लाभले. प्रा.डॉ. नसीम बेगम यांनी महाविद्यालय तर्फे रासेयो संचालक प्रा. डॉ. मारोती गायकवाड व संपूर्ण राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक ऑडिट कॅम्प अधिकार्यांचे स्वागत व सत्कार केले. शेवटी सर्वांचे आभार मानले.

### “माळीवाडा पॅटर्नचा जलवा ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत २५ विद्यार्थ्यांची दमदार यशकथा”

**(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी-** “मेहनत, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन” यांचा सुंदर संगम असलेल्या पी.एम.श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माळीवाडा यांनी यंदाच्या इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. शाळेतील तब्बल २५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवत माळीवाडा पॅटर्नची गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या यशामध्ये पार्थ पंकज बिरादार याने २७२ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अक्षदा भास्कर हरकळ हिने २६० गुणांसह द्वितीय, तर कनुप्रिया अभयसिंग नाईक हिने २४४ गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. याशिवाय आर्या विजय थोरे व जीवन पांडुरंग चिंचाणे यांनी प्रत्येकी २३६ गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच इतर विद्यार्थ्यांनीही उत्तम गुण प्राप्त करून शाळेच्या यशात मोलाचा वाटा उचलला. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे : पार्थ पंकज बिरादार २७२ अक्षदा भास्कर हरकळ २६० कनुप्रिया अभयसिंग नाईक २४४ आर्या विजय थोरे २३६ जीवन पांडुरंग चिंचाणे २३६ संध्या स्वप्निल नाईक २१० भक्ती परमेश्वर घांडगे २०४ प्रिया परमेश्वर आळसे २०२ गौरव शेषराव आहेरकर १९६ आतिफ चिन्मु शेख १८२ शिवराज बाबासाहेब इंगळे १८० प्रज्वल तुळशीराम गणगे १७८ आशिष मधुकर हरकळ १७४ श्रुती अशोक कावळे १७४ किशोर बालासाहेब वीरकर १७२ रितेश ओमप्रकाश डहाळे १७२ प्रणव महेश लाड १७० नंदिनी सुनील सोळंके १६८ आर्या रामेश्वर वाघमारे १६६ मयुरी संतोष मस्के १६२ शिवम राजेश्वर यादव १६२ निखिल चंद्रकांत बाविस्कर १५६ साईदीप शाम पोपळघट १५० अजिंक्य महादेव तेलंगे १४२ तूकेंद्र शिरीष दडके १४२ या उज्ज्वल यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, शाळेतील शिक्षकांच्या अथक परिश्रमाचेही विशेष अभिनंदन केले जात आहे.

### “ज्ञान भारतम” प्रकल्पाबाबत बैठक संपन्न

**परभणी-** भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या “ज्ञानभारतम” प्रकल्पांतर्गत हस्तलिखीत सर्वेक्षण मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेबाबत परभणी तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक मंगळवारी तहसील कार्यालयात पार पडली. भारतामध्ये अनेक ठिकाणी जुनी हस्तलिखीते उपलब्ध असून त्यांचे जतन, संवर्धन व डिजिटायझेशन करण्यासाठी केंद्र शासनाने हा प्रकल्प सुरू केला आहे. यासाठी “ ” हे मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहे. मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था तसेच खाजगी संग्रहालयांमधील हस्तलिखीतांची माहिती या मोहिमेत संकलित करण्यात येणार आहे. बैठकीत उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार मधुकर क्षिरसागर यांनी प्रकल्पाची माहिती दिली.

## गंगाखेडकरांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार आ डॉ राहुल पाटील यांनी दिला गंगाखेडकरांना शब्द;जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा भव्य नागरी सत्कार संपन्न

**परभणी-** गंगाखेड तालुका व मतदार संघ निश्चित बाळासाहेब, उद्धव ठाकरे साहेबांच्या विचारावर प्रेम करणारा आहे त्यात काही शंका नाही. आज पर्यंत मी केवळ परभणी विधानसभा पुरता कार्यक्षेत्र असल्याने मर्यादा येत होत्या परंतु आता पक्षाने संपूर्ण परभणी जिल्ह्याची संघटनात्मक जबाबदारी सोपवली आहे म्हणून यापुढे मी गंगाखेडकरांचा सुख दुःख विकासात्मक कार्यासाठी आणि पक्षाच्या जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार आहे असे प्रतिपादन परभणीचे आमदार




डॉ. राहुल पाटील यांनी केले शिवसेनेचे नूतन जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा व्यापारी संघ व विविध सामाजिक संघटना आणि शिवसेना यांच्या वतीने मोरया फंक्शन हॉल येथे नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र धर्मे,परभणी महानगरप्रमुख डॉ. विवेक नावंदर रिपब्लिकन पक्षाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ भालेराव, विठ्ठलराव रबदडे, डॉ.सुभाष कदम,माजी जि प सभापती श्रीनिवास मुंडे, नगरसेवक धम्मानंद घोबाळे, पंडितराव मुंडे गुरुजी मनोहर महाराज केंद्रे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमानी, सुभाष दादा नळदकर, उपजिल्हाप्रमुख महादेव शेंडगे, बालाजी लोखंडे, साहेबराव कल्याणकर, तालुकाप्रमुख जानकीराम पवार,बापूराव पोळ, छगनराव मोरे,तालुका संघटक धोंडीराम जाधव, शिक्षक सेनेचे बाळासाहेब राखे,सायस चिलगर शिवसेनेचे तालुका अधिकारी भागवत शिंदे शहर संघटक अमोल खटिंग ,प्रा. मुंजाजी चोरघडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉक्टर पाटील म्हणाले की परभणी जिल्हा हा कायम शिवसेनेचा बालेकिल्ला राहील यात शंका नाही भविष्यात दोन्ही जिल्हाप्रमुखाच्या शिवसैनिकाच्या मदतीने चार विधानसभेवर भगवा फडकविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी विष्णू मुरकुटे बोलताना म्हणाले की, मला शिवसेनेच्या सर्वोच्च जिल्हाप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आले ,याचे कारण मी केलेले सामाजिक कार्य, कधीही पक्षभेद न करता प्रत्येकाच्या सुखदुःखात आणि कामात उभा राहून गरजूंना मदत करत राहिलो या सर्व बाबींचा विचार करून पक्षाने माझ्यावर जबाबदारी दिली आहे ती चोखपणे पार पडणार असे वचन मी उद्धव ठाकरे साहेब आणि आमदार डॉ.राहुल पाटील यांना याप्रसंगी देत आहे. प्रास्ताविक प्रा मुंजाजी चोरघडे, सूत्रसंचालन बाळासाहेब राखे नागेश बोरीकर यांनी केले शेवटी आभार प्रदर्शन आयोजन समितीच्या वतीने डॉ.मनोहर ब्याळे यांनी मानले.

## विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवा; युवक काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन

**(गजानन चव्हाण/ दै.धर्मयोध्दा)**

**परभणी -** National Eligibility cum Entrance Test (NEET) परीक्षेतील कथित पेपरफुटी, अनियमितता आणि विद्यार्थ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेला खेळ तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देशातील लाखो विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतात. मात्र परीक्षेमध्ये सातत्याने समोर येणाऱ्या पेपरफुटी, गुणांतील विसंगती



आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षितता व नैराश्य निर्माण झाले आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

तसेच या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच पंतप्रधान यांनीही या प्रकरणाची जबाबदारी स्वीकारून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

दरम्यान, पेपरफुटी प्रकरणानंतर निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे प्रसारमाध्यमांतील वृत्तांनुसार किमान तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना समोर आल्याचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला. या घटना अत्यंत दुर्दैवी असून संबंधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत, समुपदेशन व पुनर्वसन सहाय्य द्यावे, अशी मागणी युवक काँग्रेसने केली.

यावेळी प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करावी, परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुरक्षित करावी आणि विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करावा, अशी मागणीही करण्यात आली. हे आंदोलन युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज दादा मोरे व परभणी युवक काँग्रेस प्रभारी भगवानराव पंडागळे यांच्या आदेशावरुन करण्यात आले या वेळी सचिन जवंजाळ पाटील यांच्या नेत्रत्वात आंदोलन व निवेदन दिले या वेळ ळी जि.प. सदस्य अजिद दादा वरपुडकर ,सुहास पंडीत ,मयुर मोरे ,अमोल डाखोरे,राजपाल देशमुख,डिगांबर खरवडे ,गोविंद झाडे,गोविंद चोपडे ,गोविंद शर्मा,दत्ता कदम ,कुणाल गायकवाड व इतर पदाधिकारी उपस्थीत होते

## आर्य वैश्य महासभेचे संघटक प्रदीप कोकडवार यांचा सन्मान



**(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)**

**जिंतुर -** समाजकार्य व जनहिताच्या विविध उपक्रमांत सक्रिय योगदान देणारे ज्येष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार यांना नुकताच पुणे येथे राज्यस्तरीय “आदर्श रत्न” पुरस्कार प्रदान करण्यात आला. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत माजी मंत्री आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. नांदेड येथे आयोजित वासवी अर्बन उद्धाटन कार्यक्रमात हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी प.पू. हभप एकनाथ महाराज, महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासचिव गोविंदराव बिडवई यांच्यासह अनेक मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

## संस्कार विद्यालय बीड चे तब्बल २७ विद्यार्थी शिष्यवृती साठी पात्र

**(मधुसूदन सोनवळकर/दै.धर्मयोध्दा)**

**बीड -** येथील संस्कार प्रबोधिनी संचलित संस्कार प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता पाचवी चे एकूण २७ विद्यार्थी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. फेब्रुवारी २०२६मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी च्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस संस्कार प्राथमिक विद्यालयाच्या एकूण परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी एकूण २७ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेस पात्र ठरले आहेत. तीन विद्यार्थी परीक्षेस अनुपस्थित होते. या शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्कार प्रबोधिनी संस्थेचे अध्यक्ष डॉ शरद रायते, संस्थेचे सचिव ॲड कालिदास थिगळे, उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे, संचालक सतीश दंडे, सुनील क्षीरसागर, डॉ.रेणुकादास जिंतुरकर, दिलीप खिस्ती, शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अनुराग पांगरीकर, सदस्य ॲड.मिलिंद वाघीरकर, राजेंद्र मुनोत,सुरेश गिरी, शाळेच्या मुख्याध्यापिका शोभाताई कुलकर्णी,दीपक सरदे, पाचवी ते सातवी विभागाचे विभागप्रमुख सुनील सोनवळकर, शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख परमेश्वर शेळके,आणि शिष्यवृत्ती वर्गास अध्यापन करणारे सहशिक्षक, सुनील सोनवळकर,श्याम गायकवाड,लिंबराज ठोंबरे, सर्व सहकारी शिक्षक व सर्व पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे पालक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## १८ जून रोजी विधान परिषद् निवडणूक घोषीत... बीड - धाराशिव लातूर मतदार संघात महायुतिचे पारडे जड

**(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)**

**बीड-** विधान परिषदेसाठी स्थानिक स्वराज्य मतदार संघ निवडणूकी साठी राज्यातील एकुण १७ जागेसाठी निवडणूक कार्यक्रम आयोगाकडून जहिर करण्यात आला आहे अधिकृत अधिसुचना ही २५ जून रोजी जाहिर केली जाणार आहे बीड - लातूर धाराशिव या मतदार संघातुन स्थानिक स्वराज्य म्हणजे जिल्हा परिषद पंचायत समिती महापालिका नगरपालिका नगर पंचायती सदस्य या निवडणुकी साठी मतदार म्हणुन मतदान हक्क बजावतील सदस्यांचे पक्षीय




बलाबल पाहता बीड - धाराशिव - लातूर मतदार संघासाठी महायुतीचे पारडे जड असल्याचे दिसून येते पक्षीय बलाबल पाहता बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी निवडूणुक झालेली नाही ते वगळता बीड - लातूर - धाराशिव मतदार संघात एकुण ८८१ मतदार मतदानाचा हक्क बजावतील भाजपा ३०१, राष्ट्रवादी अजित दादा गट ६८ शिंदेंची शिवसेना १३८ असे मिळून महायुतीचे ५३७ मतदार सदस्य आहेत तर काँग्रेस पक्ष १५५ ऊबाठा शिवसेनेचे ३२ राष्ट्रवादी शरद पवार गट ५४ असे एकुण २४१मतदार सदस्य महाविकास आघाडी कडे आहेत स्थानिक स्वराज्य साठी युती / आघाडी न झाल्यास निवडणुकी साठी मोठी चुरस निर्मान होण्याची शक्यता आहे सध्य स्थितीत महायुतीत भाजपाचे या मतदार संघात प्राबल्य असल्याचे चित्र आहे असा असेल निवडणूक कार्यक्रम निवडणूक अधिसूचना २५ मे रोजी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ०१ जून ऊमेदवारी अर्ज छाननी ०२ जून ऊमेदवारी अर्ज मागे घेणे ०४ जून १८ जून रोजी स. ८ ते दु .४ या वेळेत मतदान २२ जून रोजी मतमोजणी केली जाणार आहे.

## डासांचा उपद्रव वाढला

**परभणी -** शहरात मोठ्या प्रमाणावर डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे तापासारखे आजार बळावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डासांचा बंदोबस्त करण्यासाठी महानगरपालिकेने धूर फवारणी करावी, वाढत्या डासांमुळे लहान मुलांना डेंग्यु मलेरीया सारख्या अजारांचा सामना करावा लागत आहे तर उन्हाळ्याच्या दिवसात पडणाऱ्या पासामुळे साचलेल्या पाण्यापासुन डासांची निर्मिती होऊ शकते यावर काहीतरी प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## नेताजी सुभाष विद्यालयाची दहावी निकालात उज्वल कामगिरी; ८८ टक्के निकालाची परंपरा कायम

**(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी -** पाथरी येथील नेताजी सुभाष विद्यालय यांनी यंदाच्या दहावी परीक्षेच्या निकालात उल्लेखनीय यश संपादन करत उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल तब्बल ८८ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावणारा विद्यार्थी चिरंजीव आयुष अमोल राखे याने ९५ टक्के गुण मिळवत यशाचे शिखर गाठले. द्वितीय क्रमांक चिरंजीव प्रतिक विलास सोनवणे याने ९३.२८ टक्के गुणांसह मिळविला, तर कुमारी अनुष्का प्रशांत चिद्रवार हिने ९१.४० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक मिळविला. यावर्षी विद्यालयातील तब्बल ४० विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालकांसह शिक्षकवर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव श्री मदनराव नाईक, मुख्याध्यापिका सौ. दातार मॅडम, पर्यवेक्षक श्री वडकर सर तसेच ज्येष्ठ शिक्षक कोरडे, दिशागत, कापसे, मगर, चव्हाण आणि सौ. पेचफ ुले यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याची भावना पालकांनी व्यक्त केली आहे.

## भाजपच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी -** भारतीय जनता पार्टी परभणी महानगरच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान अंतर्गत जिल्हा प्रशिक्षण वर्ग कोकोनट लगून (रिसोर्ट), परभणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. या प्रशिक्षण वर्गाला पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्यात आला. संघटन बळकटीकरणासाठी प्रशिक्षण वर्ग कार्यक्रमाची सुरुवात भारत माता, पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमांचे पूजन, दीपप्रज्वलन, वर्ग गीत, महाराष्ट्र गीत आणि वंदे मातरम् ने करण्यात आली. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष मा. श्री. शिवाजी भरोसे, मा. श्री. राजेश देशमुख, ॲड. एन. डी. देशमुख, मोकिंद खिल्लारे, भालचंद्र गोरे, केदार खटिंग, मीनाताई परतानी, सीमाताई धुमाळ, संजय रिझवानी, कमलकिशोर अग्रवाल, मनिषा जाधव, रुपाली ठाकरे, डॉ. नम्रता पाटील, प्रताप देशमुख, रोहिणी हलगे, केशव थीखट, हम्मू चाऊस, अब्दुल बारी, आतिख पटेल, पिंटू कदम, प्रवीण गायकवाड, भीमराव वायवळ, गोपाळ



सोळंके, ज्ञानोबा मोरे, अंकुश अवचार, चिंतामणी भरकड, विजय गायकवाड, मधुसूदन जोशी, सुरज चोपडे, रामेश्वर आवचार, दैवत लाटे, नागेश शिंदे, बालाजी नागेश्वर, दर्शन प्रसाद, संदीप लव्हाळे, प्रशांत सांगळे, रितेश जैन, गिरीजा अजेगावकर, वैशाली दैठणकर, शंकर अजेगावकर, गणेश टाक, विश्वजीत बुधवंत, सुशीला थोरात, अद्वैत पार्डीकर, अजिंक्य गौंडेस्वार, सखाराम नन्नवरे, दिनकर कुलकर्णी, हेमंत घन, रमेश राठोड, आशिषराव गरुड, मंगेश जवळेकर, अशोक नेटके, दीपक गवारे, श्रीकांत दैठणकर, सुशांत साखरे, माणिकराव गरुड, अभिजीत मुंडे, स्वप्निल कीते, कैलास जोशी, संदीपकुमार कोकडवार, भागवत गरुड, हनुमंत सोमवंशी व इतर अनेक पदाधिकारी-कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली. विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन प्रशिक्षण वर्गातील विविध सत्रांमध्ये संघटन बळकटीकरण, वैचारिक अधिष्ठान, बूथ व्यवस्थापन, भाजपचा इतिहास, कार्यकर्ता विकास, देशासमोरील राजकीय व सामाजिक आव्हाने, कार्य विस्तार, सोशल मीडिया आणि नवीन तंत्रज्ञान () यांसह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. पहिल्या सत्रात श्रीकांतजी देशपांडे यांनी वैचारिक अधिष्ठान, दुसऱ्या सत्रात प्रवीणजी घुगे यांनी बूथ व्यवस्थापन, ६ स्थायी कार्यक्रम, मन की बात आणि , तिसऱ्या सत्रात मनोज पांगरकर यांनी भाजपचा इतिहास या विषयांवर मार्गदर्शन केले. योग शिबिर, संगीत कार्यक्रम आणि भोजनाची व्यवस्था प्रशिक्षण वर्गादरम्यान कार्यकर्त्यांसाठी योग शिबिराचेही आयोजन करण्यात आले. तिसऱ्या सत्रानंतर प्रा. ऋतुजा जोशी व सौ. अपर्णा जोशी यांच्या सुरेल स्वर-संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. चौथ्या सत्रात चित्राताई वाघ यांनी प्रत्यक्ष कार्यानुभव सत्र घेतले, तर पुढील सत्रांमध्ये पुनीत जोशी, संजय कौडगे, निखिल भावे आणि प्रदीप पेशकार यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. राष्ट्रगीताने समारोप कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. हा प्रशिक्षण वर्ग संघटन अधिक सक्षम करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना वैचारिक व कार्यात्मक बळ देण्यासाठी प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाध्यक्ष श्री शिवाजी भरोसे यांनी केले होते.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao